**प्रेसनोट** **दि.०४/०५/२०१९**

**दत्तवाडी पो.स्टे.पुणे**

## मोबाईल चोरी करणारा चोवीस तासात पोलीसांच्या ताब्यात

चोरीस गेलेला मोबाईल २४ तासात चोरणाऱ्या विधी संघर्षीत बालकासह पोलीसांना मिळाला आहे.दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे योगेश महादेव डोळसे वय ३८ वर्षे रा. सर्वे नं.१३० दांडेकर पुल, पुणे यांचा विवोकंपनीचा मोबाईल हॅण्डसेट दि.०१/०५/२०१९ रोजी सायंकाळी ०७ वाजता दोन अज्ञात मुलांनी दांडेकर पुल चौकात पायी जात असताना त्यांच्या खिशातुन जबरदस्तीने ढकलुन काढुन घेतला व पळुन गेले होते. त्या नुसार त्यांनी तक्रार दाखल केली होती. दत्तवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक कुलदिप संकपाळ ,पोलीस हवालदार तानाजी निकम, सुधीर घोटकुले, विकास कदम, राहुल ओलेकर, शिवाजी क्षीरसागर, अक्षयकुमार वाबळे यांचे पथक तयार करुन संपुर्ण परिसरात माहिती काढण्यास सांगितली असता जनता वसाहत परिसरात दोन मुले पाण्याच्या टाकीजवळ बसलची माहिती त्यांना मिळाली त्याप्रमाणे त्यांनी विधी संघर्षीत दोन मुलांना ताब्यात घेतले व त्यांच्या कडे चौकशी केली असता त्यांनी चोरलेला विवो कंपनीचा मोबाईल काढुन दिला आहे. हि कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उप निरीक्षक कुलदिप संकपाळ ,पोलीस हवालदार तानाजी निकम, सागर सुतकर, सुधीर घोटकुले, विकास कदम, राहुल ओलेकर, शिवाजी क्षीरसागर, अक्षयकुमार वाबळे यांनी केली आहे.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीसनिरीक्षक
दत्तवाडी पो.स्टे. पुणे शहर